नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२
नि. ७४ खालील आदेश

०१. अर्ज व त्यावर प्रतिवादीने दिलेले म्हणणे (नि.७५) वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज वादीने कागदपत्र दाखल करून घेण्यासाठी दिलेला आहे.

०२. सदरील अर्जाने वादीने गांव मौजे सावंतवाडी येथील नगर भूमापन क्र. १४२६अ चा उतारा व वादी, प्रतिवादीचे वडील महादेव भीम गिरी यांनी लिहून दिलेल्या बक्षिसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. प्रतिवादी याने सदर अर्जास सक्त हरकत घेवून दावा अतिशय जुना असतांना वादीने पाच वर्ष सहा महिन्याच्या काळात ते कागद दाखल केलेले नाहीत व आता अतिशय उशीराने तो केवळ वेळकाढूपणा करण्यासाठी कागदपत्र दाखल करत आहे. वास्तविक सदर कागदपत्र हे वादीच्या ताब्यात होते व ते त्याने याआधी दाखल करणे आवश्यक होते. परंतु, इतक्या प्रदीर्घ कालावधीत त्याने ते का दाखल केले नाही याचे कारण दिलेले नाही. त्यामुळे सदर कागदपत्र दाखल करून घेता येणार नाहीत. तसेच सदर दाव्यामध्ये दोन्ही बाजुंचा अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर दावा न्यायनिर्णयासाठी असताना सदरचा अर्ज वादीने दिलेला आहे. त्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

०३. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादीविरूध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा ५ वर्षाहून अधिक जुना आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी दोघांचाही पुरावा संपल्यानंतर दाव्यात युक्तीवाद झाला आहे व दावा न्यायनिणर्यासाठी असताना वादीने उशीराने प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. यावरून सर्वप्रथम विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दिल्याचे दिसून येते.

०४. वादीने या अर्जानुसार दोन कागदपत्र दाखल करून घेण्याची मागणी केली आहे त्यापैकी पहिला कागद हा दावा मिळकतीच्या भूमापन क्रमांकाचा प्रॉपर्टी कार्डचा उतारा असून दुसरा कागद हा बक्षिसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल आहे. सदरचा दावा हा वाटपासाठी असुन सदर कागद हा दावा मिळकतीचा प्रॉपर्टी कार्डचा उतारा आहे. वादीने प्रस्तुतच्या दाव्यामध्ये दावा मिळकत वादी, प्रतिवादीच्या

वडीलांनी त्या दोघांना बक्षिसपत्राने दिली आहे असे कथन केले आहे. त्यामुळे दाव्यातील मुख्य कथनाचे अनुषंगाने सदरचा कागद असल्याचे दिसते. सदर बक्षिसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल पहाता, ती वादीला दिनांक २१/०४/२०१२ रोजीच मिळालेली आहे व ती अतिशय विलंबाने या दाव्यात वादी दाखल करीत आहे याबाबत दुमत नाही. परंतु सदरील दोन्ही कागद हे दाव्यातील दावा मिळकतीबाबत व दाव्यातील मुख्य वादविषयाशी निगडीत आहेत व ते दाव्यातील आवश्यक कागदोपत्री पुरावा आहे असे वाटते. तसेच वादीने केवळ त्याला कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मिळण्याची मागणी केली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे दाव्यात सदरचे कागदपत्र दावा मिळकतीशी निगडीत असून व ते महत्वाचे कागदपत्र असल्यामुळे ते दाखल करण्यास वादीला परवानगी दिली नाही तर वादीला त्याची बाजु व्यवस्थित मांडता येणार नाही. याउलट सदर कागदपत्र दाखल करण्यास वादीला परवानगी दिली तर त्यामुळे प्रतिवादीवर कोणता अन्याय होईल असे दिसून येत नाही. सबब वरील बाबींचा विचार करता अर्ज मंजुर होण्यास पात्र दिसतो. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादीने प्रतिवादीला खर्च म्हणून रक्कम रूपये ५००/— (रूपये पाचशे मात्र) दयावयाचे आहेत.

सही/—
(एम्. एस्. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दिनांक :—०४/०१/२०१८.